Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 14 June 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १४ जून २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- नीट प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाची केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा परिषदेला नोटीस.
- राज्यात एक हजार दोनशे पंचेचाळीस महसुली मंडळात चारा डेपो उभारण्यास परवानगी.
- मानवी तस्करी करणाऱ्या एकास नाशिकमधून अटक–याप्रकरणातली सहावी कारवाई.

आणि

- आज जागतिक रक्तदान दिन विविध उपक्रमांतून साजरा.

****

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश पात्रता परीक्षा–नीटमध्ये झालेल्या कथित अनियमितता प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग–सीबीआय चौकशीच्या मागणीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा परिषदेकडून दोन आठवड्यात उत्तर मागवलं आहे. एका जनहित याचिकेवर सुनावणी दरम्यान, न्यायालयानं हे निर्देश दिले. या प्रकरणी विविध उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित प्रकरणं सर्वोच्च न्यायालयात हलवण्याबाबत राष्ट्रीय परीक्षा परिषदेच्या याचिकेवर न्यायालयानं इतर पक्षांना नोटीस जारी केली आहे.

दरम्यान, नीट परीक्षा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उमेदवारांच्या हिताची खात्री करण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ट्विटरवरील संदेशात म्हटलं आहे. कोणत्याही विद्यार्थ्याच्या भविष्याशी तडजोड केली जाणार नाही असं आश्वासन त्यांनी दिलं. नीटची

समुपदेशन प्रक्रिया लवकरच सुरू होत आहे. कोणताही संभ्रम न ठेवता यासंदर्भात पुढची प्रक्रिया आवश्यक असल्याचं प्रधान यांनी नमूद केलं आहे.

****

राज्यातील एक हजार दोनशे पंचेचाळीस दुष्काळ सदृष्य महसुली मंडळात चारा डेपो उभारण्यास शासनानं परवानगी दिली असल्याची माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज दिली. ते आज मुंबईत बोलत होते. जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यापासून राज्यात विविध ठिकाणी पावसाला सुरवात झाली असली तरी काही भागात अद्यापही दुष्काळी परिस्थिती आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण समाधानकारक होईपर्यंत दुष्काळ सदृष्य भागात चारा डेपो उभारून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी विखे पाटील यांनी शासनाकडे केली होती. सध्या राज्यात ५१२ लाख ५८ हजार मेट्रिक टन हिरवा चारा तर १४४ लाख ५५ हजार मेट्रिक टन सुका चारा उपलब्ध आहे. हा चारा जूनअखेरपर्यंत पुरेल असा अंदाज शासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

****

महिला आणि बाल विकास विभागाने ठाणे जिल्ह्यात रस्त्यावरील बालकांना समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी नाविन्यपूर्ण योजनेतंर्गत फिरतेपथक–मोबाईल स्कूल ही संकल्पना राबविली होती. या उपक्रमाअंतर्गत २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात मुंबई आणि अंबरनाथ नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील साडे चारशे ते पाचशे मुले शाळेत जाणार असल्याची माहिती जिल्हा महिला आणि बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड यांनी दिली आहे. येत्या २० जूनला या मुलांच्या शाळा प्रवेशाचा कार्यक्रम होणार आहे. ठाण्यासह राज्यातील ७ जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम पथदर्शी प्रकल्प म्हणून राबवण्यात येत आहे.

****

मानवी तस्करी आणि सायबर फसवणूक प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्था एनआयएनं आज नाशिकमध्ये सुदर्शन दराडे याला ताब्यात घेतलं. या प्रकरणी अटक करण्यात आलेला सुदर्शन हा सहावा व्यक्ती आहे. संघटित तस्करी प्रकरणात त्याचा सहभाग आढळून आला आहे. भारतीय तरुणांना नोकरीचं आमीष दाखवून त्यांना थायलंड, कंबोडिया तसंच व्हिएतनाम मार्गे तो अवैधरित्या लाओस ला पोहोचवत असल्याचं तपासात समोर आलं आहे

****

राहुरी इथलं महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण-मेडा यांनी राज्यस्तरीय सहभागातून हरित हायड्रोजन निर्मिती प्रकल्पासाठी सामंजस्य करार केला आहे. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतावर आधारित हा प्रकल्प विद्यापीठात पूर्ण केला जाणार असून, यासाठीचं तांत्रिक मार्गदर्शन आयआयटी-मुंबईकडून मिळणार आहे. या प्रकल्पामध्ये प्रामुख्याने कृषी अवशेष तसंच शहरी घनकचरा यांच्यावर प्रक्रिया करून हायड्रोजन इंधन तयार केले जाईल आणि त्यापासून वीजनिर्मिती केली जाणार आहे.

****

थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचं पुण्यात भिडेवाडा इथं राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्या दृष्टीने आवश्यक ती प्रक्रिया करुन गतीने निविदा प्रक्रिया राबवण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. ते आज पुण्यात यासंदर्भातल्या बैठकीत बोलत होते. अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यावेळी उपस्थित होते. या स्मारकात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, त्यांचा जीवनपट दर्शविणारे चित्र, दृकश्राव्य स्वरुपात त्यांच्या कार्याची माहिती, यासोबतच महिलांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्था अशी व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश पवार यांनी यावेळी दिले.

****

दरम्यान, आषाढी वारीसंदर्भातही अजित पवार यांनी एका बैठकीत आढावा घेतला. पालखी सोहळ्यादरम्यान पंढरपूर पालखी मार्ग, पालखी तळ आदी ठिकाणी पाणी, वीज, आरोग्य आणि स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. पालखी मार्गाला लागून असलेल्या जागा कायमस्वरूपी ताब्यात घेऊन त्याचा पालखी सोहळा वगळता इतर वेळी अन्य उपयोग करण्याबाबत प्रस्ताव तयार करावा .अशा जागांवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी असे सांगून, सोहळ्यासाठी शासनातर्फे आवश्यक निधी देण्यात येईल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिली.

****

पाच दिवसांच्या वार्षिक हज यात्रेला आजपासून सुरुवात झाली. या यात्रेसाठी जगभरातून सुमारे २० लाख यात्रेकरू सौदी अरेबियात मीना इथं एकत्र जमले आहेत. यात एक लाख ७५ हजार भारतीय यात्रेकरूंचाही समावेश आहे आणि

यातले १ लाख ४० हजार २० यात्रेकरू भारतीय हज समितीच्या माध्यमातून यात्रेसाठी गेले आहेत.

****

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची तयारी जगभरात मोठ्या उत्साहात सुरु आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज त्रिकोनासन किंवा त्रिकोणी स्थितीतील आसनावरील एक चित्रफित सामाजिक माध्यमांवर प्रसारित केली. एकाग्रतेसाठी तसेच कमरेच्या वरील भागातील स्नायूंची लवचिकता सुधारण्यासाठी या आसनाचा सर्वांनी सराव करावा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

****

आज जागतिक रक्तदान दिन, ए,बी आणि ओ या रक्तगटांचे शोध लावलेल्या कार्ल लॅण्डस्टायनर या नोबल पुरस्कार विजेत्या संशोधकाच्या जयंतीनिमित्त, दरवर्षी १४ जून हा दिवस रक्तदान दिन म्हणू पाळला जातो.

यानिमित्त आज छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय-घाटीच्या रक्तपेढीत माणुसकी रुग्णसेवा समूहातर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आलं. सामाजिक कार्यकर्ते सुमीत पंडित यांच्यासह २१ दात्यांनी यावेळी रक्तदान केलं. सुमीत पंडित यांनी आतापर्यंत ५६ वेळा रक्तदान केलं आहे. घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे यांच्यासह अनेक मान्यवरांनी या शिबीराला भेट देऊन सामाजिक उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

धाराशिव इथं शासकीय वैद्यकीय माहाविद्यालय आणि रुग्णालयात रक्तदान शिबीर घेण्यात आलं. परिचारिका कर्मचारी तसंच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही शिबिरात रक्तदान केलं. रुग्णालयात रक्त पुरवठा कमी असून जास्तीत जास्त दात्यांनी रक्तदान करावं असं आवाहन वैद्यकीय अधिष्ठाता डॉ शिल्पा दोमकुंडवार यावेळी केलं.

जागतिक रक्तदाता दिनानिमित्त वाशिम इथं जिल्हा रुग्णालयाच्या वतीनं जनजागृती पर कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी सायकल रॅली, रक्तदान शपथ, चित्र रेखाटन स्पर्धा तसेच पथनाट्याच्या माध्यमातून रक्तदानाविषयी जनजागृती केली.

****

वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट परीक्षा देश पातळीवर पुन्हा एकदा नव्याने घ्यावी अशी मागणी करत नांदेडमध्ये आज जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. शहरातील भाग्यनगर ते महात्मा फुले चौकापर्यंत काढलेल्या या मोर्चात विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली विशेष तपास पथक गठित करून या परीक्षेतील घोटाळ्याची चौकशी करावी, ही परीक्षा सीबीएसईच्या माध्यमातून पुन्हा घ्यावी अशी अशा मागण्या विद्यार्थ्यांनी यावेळी केल्या.

****

अहमदनगर जिल्ह्यातील आदर्श गाव हिवरे बाजार इथले  राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक बनाभाई चांदभाई सय्यद यांचं आज वृद्धापकाळानं निधन झालं. ९२ वर्षांचे होते. पंढरपूरच्या पांडुरंगाचे आणि संत ज्ञानेश्वरांचे ते निस्सीम भक्त होते, मुस्लीम समाजात जन्मलेले असूनही ते पंढरपूर, आळंदी, देहू नियमित वारी करत असत.

****

जालना जिल्ह्यातल्या बदनापूर तालुक्यात आज दुपारी चार वाजेच्या सुमारास जोरदार पाऊस झाला. सुमारे पाऊण तास झालेल्या या पावसामुळे खरिपातील लागवड झालेल्या पिकांना दिलासा मिळाला आहे. जालना शहर परिसरातही वाऱ्यासह हलक्या पावसाला सुरुवात झाली आहे.

****

बीड जिल्ह्यात १२ जून अखेरपर्यंत खरीपाच्या जवळपास पाच टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजूरकर यांनी ही माहिती दिली. वेळेवर आलेला पाऊस, आणि गतवर्षीच्या खरीपातील दुष्काळाची कसर भरुन काढण्याची शेतकऱ्यांना असलेली उत्कंठा यामुळे जिल्ह्याच्या ११ तालुक्यात ३८ हजार ५९६ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. यंदा सोयाबीनचे भाव पडल्याने शेतकऱ्यांनी कापूस आणि तूर या दोन पिकांवर अधिक भर दिल्याचं दिसून येत आहे.

****